# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

### संलग्नित महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत

या परिपत्रकाव्दारे सर्व संबधिताना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये याकरिता शासनाने सन २०१६ – १७ या वर्षापासून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेतील अनुत्तिर्ण विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा सप्टेंबर / ऑक्टोबर ऐवजी जुलै / ऑगस्ट मध्ये घेण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. सदर पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शासनाने सर्व अकृषी विद्यापीठांतील पदवी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया दि. १०/०९/२०१६ पर्यंत करण्याबाबत दि. २६/०८/२०१६ च्या पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार दि. १०/०९/२०१६ पर्यंत प्रवेश प्रक्रिया राबविणेबाबत सर्व संलग्नित महाविद्यालयांना परिपत्रक क्र. १५०/२०१६ दि. ३०/०८/२०१६ अन्वये कळविण्यात आलेले होते. तथापी, अद्यापही विद्यार्थ्यांकडून प्रवेशाबाबत विचारणा होत आहे.

तरी सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ विभाग यांनी पदवी प्रथम वर्ष अभ्यासक्रमासाठी मान्य असलेल्या जागेच्या मर्यादेत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून दि. ३०/०९/२०१६ पर्यंत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/३६२४ )
दिनांक : १४/०९/२०१६ )

14/9/16.
सहा. कुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत:

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/संस्था.